—: प्रेस नोट :— दिनांक : .०१/०२/२०२३

| | |
|---|---|
| घटक | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती. |
| ईतर आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री.रमेश गणेशराव मोहोड, वय — ६० वर्ष, पद — सरपंच, ग्रामपंचायत कारंजा बहीरम ता.चादुंरबाजार,जि.अमरावती. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३२,०००/— रुपये |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | ३२,०००/— रूपये |
| घटनास्थळ | गुणवंत महाराज, संस्थान चे परीसरामध्ये, कारंजा नाका, बहीरम, ता. चांदुरबाजार, जि.अमरावती. |
| घटना तारीख व वेळ | दि.०१/०२/२०२३ चे अंदाजे १६.०१ वा. ते १६.१३ वा.दरम्यान |

**थोडक्यात माहिती** :— यातील तक्रारदार हे समर्थ फाऊंडेशन संस्थे चे संचालक असुन संस्थेमार्फत बहीरम यात्रेमध्ये लावणी नृत्य स्पर्धा कार्यक्रम आयोजन करण्याकरीता ग्रामपंचायत कारंजा बहीरम येथील सरपंच श्री.रमेश मोहोड हे नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता लाचेची मागणी करीत असल्याची दि.०१.०२.२०२३ रोजी तक्रार दिली सदर तक्रारीचे अनुषंगाने सरपंच श्री.रमेश गणेशराव मोहोड यांची पंचासमक्ष पडताळणी केली असता सरपंच श्री.रमेश मोहोड यांनी तक्रारदार यांना बहीरम यात्रेमध्ये लावणी नृत्य स्पर्धा आयोजन करण्याकरीता नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता ३२,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले वरून लगेच सापळा कारवाई आयोजित केली असता सरपंच श्री.रमेश मोहोड यांनी गुणवंत महाराज,संस्थान चे परीसरामध्ये तक्रारदार यांचेकडुन ३२,०००/— रूपये लाच रक्कम स्विकारल्याने त्यांना लाचेच्या रक्कमेसह ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस अधिक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.मारुती जगताप सा., अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.अमरावती परीक्षेत्र, अमरावती श्री.अरूण सावंत सा., श्री.देविदास घेवारे, घटक प्रमुख श्री.संजय महाजन सा, श्री.एस.एस.भगत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री.अमोल कडु, श्री.योगेशकुमार दंदे, पो.स्टाफ माधुरी साबळे, विनोद कुंजाम,शैलेश कडु व वाहन चालक सतिष किटुकले सर्व ला.प्र.वि.अमरावती यांनी पार पाडली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा—या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती विभागाशी संपर्क साधावा.

**संपर्क** :— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती, ललित सेंटर, परांजपे कॉलनी, कॅम्प, अमरावती. टोल फ्री नंबर — १०६४ दुरध्वनी क्रमांक — ०७२१—२५५२३५५,२५५३०५५.

पोलीस उप-अधीक्षक कार्यालय सत्यमेव जयते अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

**( अमोल कडु )**
पोलीस निरिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,अमरावती.